सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७१

# महाराष्ट्र वैधानिक निधी अधिनियम

(दिनांक २६ जानेवारी, २०१६ पर्यंत सुधारित)

**Mumbai Act 71 of 1959**

# The Maharashtra Statutory Funds Act, 1959

***(As modified upto the 26th January, 2016)***

व्यवस्थापक , येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६ यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

२०१५

[ किंमत : १८ रुपये ]

वि (जे) ६६९

## सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७१

# महाराष्ट्र वैधानिक निधी, अधिनियम

## अनुक्रमणिका

**उद्देशिका**


| **कलमे** | | | **पृष्ठ** |
|---|---|---|---|
| १. | लघुसंज्ञा व प्रारंभ. | ... | २ |
| २. | वैधानिक निधी स्थापन करणे. | ... | २ |
| ३. | वैधानिक निधींचा विनियोग ज्या कारणांसाठी करता येईल ती कारणे | ... | २ |
| ४. | वैधानिक निधींत जमेस असणाऱ्या रकमांची गुंतवणूक आणि फेरगुंतवणूक. | ... | २ |
| ५. | व्याज व हप्ते. | ... | ३ |
| ६. | गुंतवणूक केलेल्या किंवा फेरगुंतवणूक केलेल्या रकमांवर येणारे व्याज वैधानिक निधींचा भाग असणे. | ... | ३ |
| ७. | नियम करण्याचा राज्य सरकारचा अधिकार. | ... | ३ |
| | अनुसूची "अ" | | |
| | अनुसूची "ब" | | |

## सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७१[1]

**[महाराष्ट्र वैधानिक निधी अधिनियम.]**

**[२८ डिसेंबर १९५९.]**

[ राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर "मुंबई राजपत्रात" दिनांक २८ डिसेंबर १९५९ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला.]

**महाराष्ट्र सन २०१२ चा २४ द्वारे सुधारित (२२-८-२०१२)**

**विवक्षित वैधानिक निधी स्थापन करण्यासाठी व ते राखून ठेवण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित असलेल्या बाबींविषयी तरतूद करण्याबाबत अधिनियम.**

१९५९ **ज्याअर्थी,** फेब्रुवारी १९५९ मध्ये मुंबई विधानसभेने, मुंबई राज्यातील विकास कार्यासाठी,
चा मुंबई विशिष्ट प्रयोजनासाठी राखून ठेवलेले निधी आणि देणगी निधी म्हणून ओळखण्यात येणारे
५. विवक्षित निधी स्थापन करण्यासाठी चौदा कोटी रुपयांच्या रकमेचे पूरक अनुदान मंजूर केले होते ;

१९५९ **आणि ज्याअर्थी,** मुंबई (पुरवणी) विनियोग अधिनियम, १९५९ अन्वये उक्त रकमेचा त्या
चा मुंबई अधिनियमाच्या अनुसूचीत दर्शविल्याप्रमाणे "५७, किरकोळ" या हिशोबाच्या सदराखाली
५. "किरकोळ" कामे व कारणे यासाठी विनियोग करण्यात आला होता ;

**आणि ज्याअर्थी,** त्यास अनुसरून महालेखापालाने चौदा कोटी रुपयांची उक्त रक्कम मुंबई राज्याच्या संचित निधीतून राज्याच्या सार्वजनिक खात्याच्या जमेस टाकली ;

**आणि ज्याअर्थी,** ऑगस्ट १९५९ मध्ये मुंबई विधानसभेने सहकारी संस्थांस सहाय्य देण्याकरिता विशिष्ट प्रयोजनासाठी राखून ठेवलेला निधी स्थापन करण्यासाठी आणखी एक कोटी रुपयांच्या रकमेचे पूरक अनुदान मंजूर केले होते ;

१९५९ **आणि ज्याअर्थी,** मुंबई (द्वितीय पुरवणी) विनियोग अधिनियम, १९५९ अन्वये उक्त एक कोटी
चा मुंबई रुपयांच्या रकमेचा त्या अधिनियमाच्या अनुसूचीत दर्शविल्याप्रमाणे "५७, किरकोळ" या हिशोबाच्या
४०. सदराखाली "किरकोळ" कामे व कारणे यासाठी विनियोग करण्यात आला होता ;

**आणि ज्याअर्थी,** त्यास अनुसरून महालेखापालाने एक कोटी रुपयांची उक्त रक्कम मुंबई राज्याच्या संचित निधीतून राज्याच्या सार्वजनिक खात्याच्या जमेस टाकली ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त विशिष्ट प्रयोजनासाठी राखून ठेवलेले निधी आणि देणगी निधी ज्या कारणांसाठी स्थापन करण्यात आले होते ज्या कारणांसाठी विधीद्वारे वैधानिक निधी स्थापन करणे आणि त्याच्याशी संबंधित असलेल्या बाबींसाठी तरतूद करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या दहाव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :--

---

१ उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी, महाराष्ट्र शासन राजपत्र, १९५९, भाग पाच, पृष्ठ ८२४ पहा.

लघु संज्ञा व प्रारंभ. **१.** (१) या अधिनियमास [1][ महाराष्ट्र वैधानिक निधी अधिनियम, १९५९ ] असे म्हणावे.

(२) तो राज्य सरकार, राजपत्रांतील अधिसूचनेद्वारे नियुक्त करील त्या तारखेस अंमलात येईल.

वैधानिक निधी स्थापन करणे. **२.** (१) हा अधिनियम अंमलात आल्यावर अनुसूचि "अ" मध्ये निर्दिष्ट केलेले वैधानिक निधी स्थापन करण्यात येतील.

(२) या अधिनियमाच्या आणि तदन्वये केलेल्या नियमांच्या उपबंधास अधीन राहून, पोट-कलम (१) अन्वये स्थापन केलेले वैधानिक निधी मुंबईच्या राज्यपालांच्यावतीने मुंबई सरकारच्या वित्त विभागाचे सचिव यांनी धारण केले पाहिजेत व ते राखून ठेवले पाहिजेत.

(३) हा अधिनियम अंमलात येईल त्या तारखेस राज्याच्या सार्वजनिक खात्यात अनुसूची "ब" मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे विशिष्ट प्रयोजनासाठी राखून ठेवलेल्या आणि देणगी निधीपैकी प्रत्येक निधीच्या जमेस असणाऱ्या रकमेचा, पोट-कलम (१) अन्वये स्थापन केलेल्या संबंधित वैधानिक निधीत भरणा केला पाहिजे.

वैधानिक निधींचा विनियोग ज्या कारणांसाठी करता येईल ती कारणे. **३.** (१) कलम २, पोट-कलम (१) अन्वये स्थापन केलेल्या वैधानिक निधींतून यांत पुढे तरतूद केलेल्या रीतीने आणि अशी तरतूद केलेल्या कारणासाठी व अशा मर्यादेपर्यंत असेल त्याव्यतिरिक्त, कोणत्याही रकमा देता कामा नयेत किंवा त्यांचा विनियोग करता कामा नये.

(२) वैधानिक निधींच्या जमेस असणाऱ्या रकमांचा विनियोग हा अनुसूची "ब" मध्ये नमूद केलेले, संबंधित विशिष्ट प्रयोजनासाठी राखून ठेवलेले आणि देणगी निधी यासाठी दिलेल्या अनुदानांचा ज्या कारणासाठी, ज्या रीतीने व ज्या मर्यादेपर्यंत विनियोग करता येईल त्याच कारणासाठी त्याच रीतीने व त्याच मर्यादेपर्यंत करता येईल.

वैधानिक निधींत जमेस असणाऱ्या रकमांची गुंतवणूक आणि फेरगुंतवणूक. **४.** राज्य सरकारने वेळोवेळी अनुसूची "अ" मधील १०, ११ व १२ या अनुक्रमांकांच्यावैधानिक निधींत जमेस असणाऱ्या सर्व रकमांची गुंतवणूक किंवा फेरगुंतवणूक सरकारी कर्ज अधिनियम, १९४४ याचे कलम २, कंडिका (२) यांत व्याख्या केल्याप्रमाणेच्या सरकारी तारणपत्रात मुंबई सरकारचे सचिव, वित्त विभाग यांच्या नावे किंवा राज्य सरकार याबाबत निर्दिष्ट करील अशा इतर अधिकाऱ्यांच्या नावाने केली पाहिजे आणि राज्य सरकारला इतर वैधानिक निधीत जमेस असणाऱ्या सर्व किंवा कोणत्याही रकमांची गुंतवणूक किंवा फेरगुंतवणूक त्याच रीतीने करण्याचा अधिकार आहे. १९४४ चा मुंबई १८.

---

१ सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या अनुसूचीतील अनुक्रमांक ७९ अन्वये मूळ शीर्षकात सुधारणा करण्यात आली व ती दिनांक १ मे १९६० पासून करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.

**५.** कोणत्याही वैधानिक निधीतून दिलेल्या प्रत्येक कर्जावर, कलम ३, पोट-कलम (२) यास अधीन ठेवून, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांनी ठरविण्यात येईल अशा दराने व्याज पडेल आणि त्यात ठरविण्यात येईल अशा हप्त्यांत आणि ठरविण्यात येईल अशा मुदतींत त्याची परतफेड करण्यात आली पाहिजे. व्याज व हप्ते.

**६.** कलम ४ किंवा कलम ५ अन्वयेच्या रकमांवर वेळोवेळी जे व्याज येईल ते संबंधित वैधानिक निधीचा भाग असेल. गुंतवणूक केलेल्या किंवा फेरगुंतवणूक केलेल्या रकमांवर येणारे व्याज वैधानिक निधींचा भाग असणे.

**७.** (१) राज्य सरकारला **राजपत्रांतील** अधिसूचनेद्वारे या अधिनियमाचे उपबंध अंमलात आणण्याच्या कारणासाठी नियम करण्याचा अधिकार आहे. नियम करण्याचा राज्य सरकारचा अधिकार.

(२) या कलमान्वये केलेले सर्व नियम, ते करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे निदान तीस दिवस ठेवले पाहिजेत आणि ते ज्या अधिवेशनात अशा रीतीने ठेवले असतील त्या अधिवेशनात किंवा त्याच्या लगतनंतरच्या अधिवेशनात राज्य विधानमंडळ त्यात जे फेरफार करील त्या फेरफारांस पात्र असतील.

## अनुसूची "अ"

(कलम २ पहा)

(१) पाणीपुरवठा निधी.
(२) संकटनिवारण निधी.
(३) सुखसोयी निधी.
(४) शिक्षणविषयक इमारतीकरिता निधी.
(५) महिला नोकरवर्गासाठी इमारतीकरिता निधी.
(६) इमारती उपयोगी जमीन विकास निधी (गृहनिर्माण निधी).
(७) अर्धविकसित क्षेत्रांचा विकास निधी.
(८) मत्स्योद्योग विकास निधी.
(९) सहकारी संस्था सहाय्य निधी.
(१०) वैद्यकीय संशोधन देणगी निधी.
(११) शास्त्रीय व औद्योगिक संशोधन देणगी निधी.
(१२) शेतकी संशोधन देणगी निधी.

## अनुसूची "ब"

(कलम ३ पहा)

| अ. क्र. | निधीचे नाव | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | रुपये | |
| १ | पाणीपुरवठा निधी | .. ३,००,००,००० | गावात व ३०,००० पेक्षा अधिक लोकसंख्या नसलेल्या, नगरपालिका शहरांत पाणीपुरवठ्याच्या योजनांसाठी आर्थिक सहाय्य देण्याकरिता या निधीचा उपयोग करण्यात येईल. परंतु शहरी क्षेत्रापेक्षा ग्रामीण क्षेत्रासच प्राधान्य देण्यात येईल. निधींतून दीर्घ मुदतीची कर्जे त्यावर शेकडा ३ टक्के व्याजाच्या दराने देण्यात येतील व ती कर्जे २५ वर्षे मुदतीत परतफेड करण्याजोगी असतील. या निधीचा उपयोग फक्त कर्ज देण्यासाठीच करण्यात येईल. त्याचा सहाय्यक अनुदान देण्यासाठी उपयोग केला जाणार नाही. |
| २ | दुष्काळी परिस्थिती-व्यतिरिक्त इतर नैसर्गिक आपत्तीमुळे संकटग्रस्त झालेल्यांना सहाय्य देण्याकरिता निधी. | .. ५०,००,००० | या निधीचा उपयोग कर्जे व सहाय्यक अनुदान या दोन्हीसाठी करण्यात येईल. दुष्काळी परिस्थितीत सहाय्य देण्यासाठी (दुष्काळनिवारण निधी) वेगळा निधी असल्यामुळे त्यासाठी या निधीतून सहाय्य देण्यात येणार नाही. |
| ३ | क्रीडांगणे, उद्याने, बगीचे, नाट्यगृहे इत्यादी सुख-सोयींची तरतूद करण्या-करिता निधी. | .. ५०,००,००० | या निधीतून, नगरपालिका, जिल्हा स्थानिक मंडळे, आणि ग्रामपंचायतींना दीर्घ मुदतीची कर्जे देण्यात येतील. या कर्जावर शेकडा ३ टक्के या अल्प दराने व्याज आकारण्यात येईल आणि ती २५ वर्षांच्या मुदतीत परतफेड करण्याजोगी असतील. |
| ४ | विद्यार्थ्यांकरिता वसतिगृहे, शिक्षकवर्गाकरिता राहण्याची घरे आणि शाळा किंवा महाविद्यालये यांच्या इमारती बांधण्यासाठी निधी. | .. २,००,००,००० | या निधीतून शैक्षणिक संस्थांना कर्जे देण्यात येतील. या कर्जांवरील व्याजाचा दर शेकडा ३ टक्के असेल आणि ती २५ वर्षांच्या मुदतीत परतफेड करण्याजोगी असतील. |

**अनुसूची "ब"**--चालू

| अ. क्र. | निधीचे नाव | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | रुपये | |
| ५ | परिचारिका, सूतिका, शाळेतील शिक्षिका आणि समाज सेविका यांच्याकरिता ग्रामीण विभागात व अर्ध-शहरी क्षेत्रांत राहण्याची घरे बांधण्यासाठी निधी. | .. १,००,००,००० | या निधीतून शेकडा ३ टक्के व्याजाच्या दराने २५ वर्षांत परतफेड करण्याजोगी कर्जे, ग्रामपंचायतींना व स्थानिक संस्थांना देण्यात येतील. |
| ६ | गृहनिर्माण निधी | .. २,००,००,००० | या निधीतून सहकारी गृहनिर्माण संस्था, नगरपालिका किंवा स्थानिक मंडळे यांना ज्या जमिनीवर घरबांधणीचे काम हाती घ्यावयाचे असेल त्या जमिनीचा विकास करण्यासाठी व त्यावर घरबांधणीस उत्तेजन देण्याकरिता कर्जे देण्यात येतील. या कर्जांवर शेकडा ३ टक्के या दराने व्याज आकारण्यात येईल. ती २५ वर्षांच्या मुदतीत परतफेड करण्याजोगी असतील. |
| ७ | राज्यातील आर्थिकदृष्ट्या अर्धविकसित क्षेत्रांची सुधारणा करण्याकरिता निधी. | .. १,५०,००,००० | पंचवार्षिक योजनेत अंतर्भूत असलेल्या विकासयोजना जलदगतीने पार पाडण्याकरिता आणि राज्यातील आर्थिकदृष्ट्या अर्धविकसित असलेल्या क्षेत्रांत ज्या योजनांचे लवकर परिणाम दिसून येतील अशा अतिरिक्त योजना हाती घेणे हा या निधीचा हेतु आहे. या कर्जांवर शेकडा ३ टक्के या दराने व्याज आकारण्यात येईल आणि ती २५ वर्षांच्या मुदतीत परतफेड करण्याजोगी असतील. |
| ८ | मत्स्योद्योग निधी | .. ५०,००,००० | या निधीतून मत्स्योद्योग सहकारी संस्थांना, शेकडा ३ टक्के या व्याजाच्या दराने व २५ वर्षांच्या मुदतीत परतफेड करण्याजोगी कर्जे देण्यात येतील. या कर्जाशिवाय आणखी काही अनुदाने देणे आवश्यक असेल तर ती खात्यांतील तरतुदींतून देण्यात येतील; वेगळ्या ठेवलेल्या या निधीतून देण्यात येणार नाही. |

**अनुसूचि "ब"**--चालू

| अ. क्र. | निधीचे नाव | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | रुपये | |
| ९ | सहकारी संस्थांना सहाय्य.. देण्यासाठी निधी. | १,००,००,००० | जमीन व यंत्रसामग्री खरेदी करण्यासाठी व इमारती बांधण्यासाठी कर्जाची ज्यांना आवश्यकता आहे अशा सहकारी प्रोसेसिंग संस्था व संयुक्तपणे शेती करणाऱ्या सहकारी संस्थांना दरसाल ३ टक्के या दराने व्याज आकारून दीर्घ मुदतीची कर्जे मंजूर करण्यासाठी निधीचा उपयोग करण्यात येईल. उक्त कर्ज, दहा हप्त्यांहून अधिक नसतील इतक्या हप्त्यांत परत करता येईल. आर्थिक सहाय्य देणारी केंद्रीय संस्था आणि शिखर (Apex) सहकारी बँका यांच्याशी स्पर्धा होणार नाही किंवा या संस्थांचे कामकाज कोणत्याही प्रकारे कमजोर होणार नाही या गोष्टींचा विचार केल्यानंतर उक्त कर्जे मंजूर करण्यात आली पाहिजेत. या निधीची व्यवस्था वित्त विभागाकडून ठेवण्यात येईल. |
| १० | वैद्यकीय संशोधन देणगी.. निधी. | १,००,००,००० | या निधीत १ कोटी रुपये असतील आणि ही रक्कम, रोख शिल्लक गुंतविण्या-बाबतच्या हिशोबातून तारणपत्रांचे हस्तांतरण करून उभारण्यात येईल. या निधीत असलेल्या तारणापत्रांवर व्याजाच्या ज्या रकमा मिळतील त्याच रकमा संशोधनाच्या योजनांस आर्थिक सहाय्य देण्यासाठी उपयोगात आणल्या जातील. निधीतील मूळ रक्कम अबाधित राहील. इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्चच्या धर्तीवर या निधीची व्यवस्था ठेवण्यात येईल. |
| ११ | शास्त्रीय व औद्योगिक.. संशोधन देणगी निधी | १,००,००,००० | या निधीत १ कोटी रुपये असतील व ही रक्कम, रोख शिल्लक गुंतविण्याबाबतच्या हिशोबातून तारणपत्रांचे हस्तांतर करून उभारण्यात येईल. या निधीत असलेल्या |

**अनुसूची "ब"--**चालू

| अ. क्र. | निधीचे नाव | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | रुपये | तारणपत्रांवर व्याजाच्या ज्या रकमा मिळतील त्याच रकमा संशोधनविषयक योजनांना अर्थ सहाय्य देण्यासाठी उपयोगात आणल्या जातील, निधीतील मूळ रक्कम अबाधित राहील. इंडियन कॉन्सिल ऑफ मेडिकल रिसर्चच्या धर्तीवर या निधीची व्यवस्था ठेवण्यात येईल. |
| १२ | शेतकी संशोधन देणगी निधी. | .. १,००,००,००० | या निधीत १ कोटी रुपये असतील आणि उक्त रक्कम, ही रोख शिल्लक गुंत-विण्याबातच्या हिशोबातून तारणपत्रांचे हस्तांतरण करून उभारण्यात येईल. या निधीत असलेल्या तारणपत्रांवर व्याजाच्या ज्या रकमा मिळतील त्याच रकमा संशोधनविषयक योजनांना अर्थ साहाय्य देण्यासाठी उपयोगात आणल्या जातील, निधीतील मूळ रक्कम अबाधित राहील. इंडियन कॉन्सिल ऑफ ॲग्रि-कल्चरल रिसर्चच्या धर्तीवर या निधीची व्यवस्था ठेवण्यात येईल. |

येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे - ६

# महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**
  शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय,
  महाराष्ट्र राज्य,
  नेताजी सुभाष मार्ग, मुंबई-४०० ००४.
  दूरध्वनी : ०२२-२३६३०६९५
  ०२२-२३६३४०४९

- **व्यवस्थापक**
  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार,
  फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. नजीक.
  पुणे-४११ ००१.
  दूरध्वनी : ०२०-२६१२५८०८
  ०२०-२६१२४७५९

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार,
  सिव्हील लाईन्स, नागपूर-४४० ००१.
  दूरध्वनी : ०७१२-२५६२६१५

- **सहायक संचालक**
  शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार
  शहागंज, गांधी चौकाजवळ,
  औरंगाबाद-४३१ ००१.
  दूरध्वनी : ०२४०-२३४३३९६
  ०२४०-२३३१४६८

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
  ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६ ००३.
  दूरध्वनी : ०२३१-२६५०४०२

**महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते**